**वारस अर्ज क्र.४९/२०२५**
**अशोक वि. अरविंद**
**निशाणी क्र. २३ खाली**

**अर्जदारतर्फे सा.क्र.१ चा पुढील सरतपास/जबाब अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री.व्ही.बी.मोहिते यांचेमार्फत शपथेवर सुरु-**

सदर अर्जाकामी दाखल केलेले माझे पुराव्याचे शपथपत्र मला दाखवले. त्यातील मजकूर बरोबर आहे व त्यावर माझी सही आहे. त्यास यापूर्वी **नि.क्र.२३** देण्यात आली आहे. मी संचिकेवर मालमत्ता क्र.५५४ चा ८ अ चा उतारा दाखल केला आहे. त्यास **नि.क्र. २५** देण्यात येत आहे. मी संचिकेवर ज्ञानू सिताराम आढाव यांचा मृत्यु दाखला दाखल केला आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येत आहे. मी संचिकेवर दि.२२.०७.२०२५ रोजीचा ग्रामपंचायत गुणवरे, ता. फलटण यांनी दिलेले पत्र दाखल केलेले आहे. त्यास **नि.क्र.२७** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास जाबदारतर्फे विधीज्ञ श्री. डी.एस.पिसे यांच्यामार्फत सुरु-**

२. माझे शिक्षण दुसरी पर्यंत झाले आहे. मला वाचता लिहिता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे शपथपत्र वाचून पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मालमत्ता क्र. ५५४ याचा सिटी सर्वे नंबर काय आहे हे मला सांगता येणार नाही. मला माहित नाही की, सन १९८८ च्या दरम्यान गुणवरे गावातील गावठाण मिळकतींना सिटी सर्वे नंबर दिले होते किंवा काय. मला माहित नाही की, आजरोजी गुणवरे गावातील गावठाण मिळकतींना सिटी सर्वे नंबर दिलेले आहेत व त्याचा नकाशा तयार झालेला आहे किंवा काय. मी माझ्या अर्जामध्ये मालमत्ता क्र.५५४ च्या चतुःसिमा नमुद केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मिळकत क्र.५५४ ही घर मिळकत अस्तित्वातच नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेली नि.क्र.२७ वर सरपंच यांची सही नाही, तसेच जावक क्रमांक नमुद नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२५ वरील नमुना ८ अ चा उतारा हा कर आकारणीसाठी आहे, तो मालकीचा पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जाचे कामी माझे कथन सिद्ध करण्यासाठी कोणताही सबळ कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अर्जातील कथनांप्रमाणे कोणतीही मिळकत अस्तित्वात नसल्यामुळे मी खोटा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामपंचायत अधिकारी यांना हाताशी धरुन नि.क्र.२५ व २७ वरील खोटे कागदपत्र तयार करुन दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया मजकूराचा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष,

फलटण. (ए.एस.साटोटे)
दिनांकः ०९.०६.२०२६ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण